# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थप्रशासन विभाग

---

<u>तात्काळ</u>

## परिपत्रक

जा.क. अप्रवि / सेवार्थ / 1639 / 2015 दिनांक :– 02 / 12 / 2015

**विषय :– एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीव्दारे वैद्यकीय देयके सादर करण्याच्या कार्यवाही बाबत.**

संदर्भ :– 1. महाराष्ट्र शासन निर्णय क.–कृषि व पदुम विभाग क.कृषिवि 2012 / प्र.क. 169 / 8–अे, दि. 23.11.2012
2. महाराष्ट्र शासन निर्णय क.–कृषि व पदुम विभाग क.कृषिवि 2012 / प्र.क. 169 / 8–अे, दि. 30.05.2015

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमधून काढण्याबाबतचा संदर्भांकित निर्णय झालेला आहे. तसेच संदर्भ क. 2 नुसार या विद्यापीठातील वैद्यकीय देयके या प्रणालीमार्फतच आता कोषागार कार्यालयात सादर करावयाचे आहे. यासाठी सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरील सर्व वैद्यकीय देयके त्यांच्या अधिनस्त येणारे वेतन व लेखाधिकारी अकोला / नागपूर याच्याकडे सादर करावे.

वेतन व लेखाधिकारी अकोला / नागपूर यांच्याकडे उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले वैद्यकीय देयकांचे त्यांनी अंकेक्षण करून सदर वैद्यकीय देयके पारीत करण्यासाठी आवश्यक या सर्व बाबींची पूर्तता झाल्याचे प्रमाणपत्र नियंत्रक कार्यालयाला दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सदर वैद्यकीय देयक आणि त्यावरील संबंधित देयक पारीत करण्याबाबतचे प्रमाणपत्रासह सादर करावेत. सदर वैद्यकीय देयकामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आल्यास वेतन व लेखाधिकारी अकोला / नागपूर यांना वैयक्तिक जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे सदर वैद्यकीय देयके नियंत्रक कार्यालयात सादर करतांना आवश्यक ते अंकेक्षण झाले की नाही याबाबची शहानिशा वेतन व लेखाधिकारी अकोला / नागपूर यांनी करून घ्यावी.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले वैद्यकीय देयके नियंत्रक कार्यालयातील विभाग सर्व वैद्यकीय देयकांची एकत्रित रक्कमेचे एकत्रित देयकाबाबतची कार्यवाही दर महिन्याच्या 15 तारखेला पूर्ण करून उपविभागीय कृषि अधिकारी, अकोला यांच्याकडे सदर देयके पारीत करण्यासाठी सादर करण्यात येते.

(कु. एम.पी.रागिनवार)
**नियंत्रक**
**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,**
**अकोला**

प्रतिलीपी :– 1. मा. **कुलगुरू,** डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे स्विय सहाय्यक यांना माहीतीसाठी सविनय सादर.
2. मा. **कुलसचिव**, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीतीसाठी
3. सर्व विभाग प्रमुख / सर्व आहरण व संवितरण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला